**<u>नि.दि.दावा क्र. ६६९/२०१९</u>**

निशाणी क्र.७५ लगत.

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उर्वरित सरतपासात शपथेवर वादीतर्फे विधीज्ञ श्री. बी बी ब–हाटे यांचेमार्फत</u>–

मी यादी नि.क्र.३ नुसार वाद मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. मी गट क्र.२०९ व ४४१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उता–यांना अनुक्रमे **निशाणी क्र.७८ व ७९** देण्यात येते. मी मौजे भाळवणी येथील घर सि.स.क्र.१५७ चा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी क्र.८०** देण्यात येते. मी दावा क्र.४६३/२०१७ मधील हुकुमनाम्याची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.८१** देण्यात येते. तसेच मी दावा क्र.४६३/२०१७ मधील तडजोड सुलेनाम्याची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.८२** देण्यात येते. दावा क्र.४६३/२०१७ मधील तडजोड झालेली निशाणी क्र.११ ची प्रत दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.८३** देण्यात येते. तसेच मी फेरफार क्र.५८५ चा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी क्र.८४** देण्यात येते.

उर्वरित सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. ए एन रोहोकले यांचेमार्फत</u>–

माझे पती यांना मोठया चार बहिणी आहेत. ते सर्वात लहान आहेत. माइया नणदांची लग्ने होऊन त्या त्यांच्या सासरी नांदत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी सासु आजारपणात मयत झाली आहे. माझे सासरे आजारपणात मयत झाले का मला माहित नाही. मी सन २०१७ मध्ये माहेरी निघून गेले. त्यानंतर सासरी आले नाही.

<u>विधिज्ञांचा तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला</u>.

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

( एम. सी. शेख )

दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पारनेर

दिनांकः– २९/०९/२०२५

पारनेर

**<u>नि.दि.दावा क्र. ६६९/२०१९</u>**

निशाणी क्र.७५ लगत.

<u>शपथेवर उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. ए एन रोहोकले यांचेमार्फत पुढे सुरु–</u>

प्रतिवादी क्र.३ मणकर्णा ढगे ही माझी नणंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती मोठी असल्यामुळे सर्वांच शिक्षणाचा व मुलीच्या लग्नाच्या खर्च त्यांनी केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीची आर्थिक परिस्थिती हालाखीची होती. लग्न होण्यापुर्वी माझ्या पतीची आर्थिक परिस्थिती चांगली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासु सासरे आजारी असल्यामुळे त्यांच्या दवाखान्याचा खर्च प्रतिवादी क्र.३ ही करत होती. हे म्हणणे खरे नाही की, परिस्थिती चांगली असल्याबाबत व त्याने खर्च न केल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाटप झाल्यानंतर गट क्र.४४१ मधील माझे पती रेवणनाथ यांच्या नावे २० गुंठे जमीन आली. हे म्हणणे खरे आहे की, माझे सासरे यांच्या नावे गट क्र.४४१ मध्ये १३ गुंठे जमीन आली. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ च्या नावे गट क्र.२०९ मध्ये ४९ गुंठे जमीन आली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ने माझे पती व इतर बहिणींचा खर्च केला असल्यामुळे तिच्या नावे ४९ गुंठे जमीन देऊन इतर बहिणींनी हक्कसोड करुन दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्यात झालेल्या वाटपाप्रमाणे ते आपआपली जमीन वहिवाट करत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील मिळकती या सासरे व चुलत सासरे यांच्यामध्ये सामाईक आहेत. मी घर मिळकतीचे उतारे पाहिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सि.स.क्र.१५७ व १५८ हे माझ्या सासरे व त्यांचे भाऊ यांच्यामध्ये सामाईक आहेत.

प्रश्न– तुमचे सासरे व त्यांचे भावांमध्ये वाटणी झाल्याबाबत कागदपत्र दाखल करु शकता का?

उत्तर– मला त्याबाबत माहिती नाही.

दावा मिळकती सामाईकात आहेत किंवा स्वतंत्र आहेत याबाबत मला माहिती नाही. मला घराच्या वाटपाबाबत माहिती नाही. मी सदर प्रतिवादींविरुध्द रे.मु.क्र.७३८/२०१७ दाखल केला होता का हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर सदरचा वाटपाचा दावा दाखल केला आहे.

हे म्हणणे खरे आहे की, नगरमध्ये पोटगीचा दावा दाखल आहे. त्या पोटगीच्या दाव्यामधे प्रतिवादी क्र.२ हे आम्हा सर्वांना रु.७५००/– पोटगी कधी भरतात तर कधी भरत नाहीत. तसेच त्या दाव्यामध्ये अंतरिम पोटगी एकुण रु.१३,०००/– आहे व ती देखील ते कधी भरतात व कधी भरत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पोटगीची रक्कम दरमहा भरत आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दाव्यामध्ये प्रतिवादींविरुध्द ज्या सर्व मागण्या केल्या आहेत व आरोप केलेले आहेत ते खोटे आहेत. सदर दावा करण्याचे कारण मला दोन अपत्य असून त्यांनी माझ्या मुलांचा विचार न करता सर्व मिळकत प्रतिवादी क्र.३ च्या नावे करुन टाकली आहे. सदर घटना सन २०१६ मध्ये घडली. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी कथन करुन प्रतिवादींविरुध्द खोटा दावा दाखल केला आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/–

दिनांकः– ०३/११/२०२५ ( एम. सी. शेख )

पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पारनेर